# बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे एप्रील २०१८

## जोगेश्वरी पोलीस ठाणे, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | जोगेश्वरी पोलीस ठाणे गुरक्र ५४/२०१८ कलम ३०२,३०७,३९७ भादंवि. सह कलम ३७(१) सह १३५ मपोका. |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक १०/०४/२०१८ रोजी ०१.४० वा.चे सुमारास |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | मनोज डेरी समोर, स्वामी समर्थ मठाजवळ फुटपाथवर, नटवर नगर, रोड नं.०५, जोगेश्वरी पूर्व मुंबई |
| ४ | **फिर्यादी** | श्री गुलाम रब्बानी शमीम खान वय २४ वर्षे, व्यवसाय – रिक्षाचालक रा.ठि. धनगर वाडी, भंगीवाडा चाळ, इटालियन बेकरीच्या समोर, मदिना मस्जिद जवळ, जुहू गल्ली, अंधेरी पश्चिम मुंबई ५८. |
| ५ | **~~बळीत~~/मयत** | गुलाम जाबीर शमिम खान वय ३१ वर्षे |
| ६ | **आरोपी अटक** | अमितकुमार उर्फ अम्मु उर्फ सिकंदर हरिराम बाथम वय २० वर्षे<br>**अटक दिनांक १२/०४/२०१८ रोजी १६.३० वा.** |

जोगेश्वरी पोलीस ठाणे गुरक्र ५४/२०१८ कलम ३०२,३०७,३९७ भादंवि. सह कलम ३७(१) सह १३५ मपोका. या गुन्हयात दिनांक १०/०४/२०१८ रोजी ०१.४० वा.चे सुमारास मनोज डेरी समोर, स्वामी समर्थ मठाजवळ फुटपाथवर, नटवर नगर, रोड नं.०५, जोगेश्वरी पूर्व मुंबई.याठिकाणी यातील फिर्यादी यांचा भाऊ नामे गुलाम जाबीर शमिम खान, वय ३१ वर्षे हा त्यांच्या ऑटो रिक्षा क्र. एम.एच.०२ डीयु ९७५२ सह मनोज डेअरी समोर, स्वामी समर्थ मठाजवळ फुटपाथवर, नटवर नगर, रोड नं.०५, जोगेश्वरी पूर्व मुंबई येथे असताना अज्ञात आरोपीत इसमाने अज्ञात कारणाने गुलाम जाबीर शमिम खान वय ३१ वर्षे, यांच्या गळयावर धारधार शस्त्राने वार करून गंभीर जखमी करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन म्हणून दिनांक १०/०४/२०१८ रोजी सदर अज्ञात इसमाविरूध्द भादवि कलम ३०७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

जोगेश्वरी पोलीस ठाणेच्या पथकाने तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवून सदर ठिकाणी कोणी साक्षीदार आहेत का? याबाबत कसुन तपास केला. सदर ठिकाणी आजुबाजुच्या इमारतीचे, दुकानांचे सिसिटिव्ही फुटेज तपासण्यात आले. सदर पथकाने जखमी इसम याची रूग्णालयात भेट घेवून गुन्हयाचा घटनाक्रम पुन्हा समजावून घेतला. यातील सदर पथकाने यातील जखमी इसम हा व्यवसायाने रिक्षा चालक असल्याने त्याचे रिक्षातुन कोणी आले होते किंवा कसे? याबाबत आजुबाजुच्या परिसरातील अनेक लोकांकडेही चौकशी केली. घटनास्थळी कोणताच दुवा नसल्याने सदर पथकाने आजुबाजुच्या परिसरातील व जोगेश्वरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणारे सर्व मुख्य रस्ते व त्यावरील १९ सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली.

सदर पथकाने प्राप्त सिसिटिव्ही फुटेजची बारकाईने तपासणी करता, जखमी इसमाची रिक्षा येणाऱ्या रूटवर लक्ष केंद्रीत करता, सदर पथकास अंधेरी सब–वे कडुन सदभक्तीकडे येणारी रिक्षा ही जखमी इसमाची ऑटो रिक्षा असल्याचे दिसुन आले. तसेच सदर सिसिटिव्ही फुटेजचे बारकाईने अवलोकन करता, सदरची रिक्षा ही जखमी इसम गुलाम जाबीर शमिम खान हाच रिक्षा चालवत असल्याचे व मागे पॅसेंजरच्या ठिकाणी सिटवर एक रिक्षाचालक युनिफॉर्ममध्ये बसल्याचे दिसुन आले. तसेच सदर रिक्षा ही ०१.३५ वा. सदभक्ती येथून जवळच असलेले घटनास्थळ या ठिकाणी गेल्याचे दिसुन आले. प्राप्त सिटिव्ही फुटेजच्या वेळेची नोंद घेता, नमुद घटना ही ०१.४२ वा. घडली असुन सदर पथकास रिक्षातील मागे बसलेला इसम हा पॅन्ट पायापर्यत एका बाजुने दुमडून व त्याने परीधान केलेला शर्ट उलटा करून खांदयावर टाकुन कावरा–बावरा होवून इकडे–तिकडे पहात ०१.५२ वा. जात असताना दिसुन आला. सदर पथकाने फुटेजवरुन संशयीत आरोपी नक्की केला. तसेच नमुद सिसिटिव्ही फुटेजद्वारे त्यातील संशयीत इसमाचा फोटो तांत्रिक पध्दतीने डेव्हलप केला. सदर पथकाने प्राप्त फोटोग्राफ जखमी इसम राहात असलेल्या परीसरात तसेच तो रिक्षाचा धंदा करीत असलेल्या ठिकाणी जुहु गल्ली येथे दाखवुन कसुन चौकशी केली. तसेच सदर पथकाने अनेक रिक्षा चालकांकडे कौश्यल्यपुर्ण तपास करता, काही रिक्षा चालकांनी फुटेजमधील संशयीत इसम हा अमितकुमार उर्फ अम्मु असल्याचे सांगितले.

सदर पथकाने जखमी गुलाम जाबीर शमिम खान, वय ३१ वर्षे याचे मोबाईल हॅण्डसेटचे बारकाईने अवलोकन करता, घटनेच्या अगोदर जखमी इसमाचे मोबाईल फोनवरुन दोन कॉल एकाच व्यक्तीस केल्याचे

आढळले व नमुद मोबाईल फोन घटना घडल्यापासुन बंद असल्याचे आढळले. त्यावरून सदर पथकाने नमुद मोबाईल क्रमांकाचा सिडीआर काढून त्याची बारकाईने तपासणी केली असता, सदरचा मोबाईल क्रमांक हा धर्मेद्र बाथम यांचे नावे नोंद असल्याची माहिती प्राप्त झाली. सदर पथकाने नमुद मोबाईल क्रमांकाचे एसडीआर चे आधारे नमुद धमेंद्र बाथम धंदा—रिक्षाचालक यास जुहू गल्ली येथून ताब्यात घेतले. ताब्यातील धमेंद्र बाथम याचेकडे कसुन विचारपूस करता, त्याने सदर मोबाईल हा त्याचा भाऊ अमितकुमार उर्फ अम्मु वय २० वर्षे. धंदा—रिक्षाचालक, रा.ठी. जुहू गल्ली, अंधेरी, पश्चिम मुंबई यास वापरा करीता दिल्याचे सांगितले.

यावरुन सदर पथकाने नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपी हा अमितकुमार उर्फ अम्मु हाच असल्याची खात्री झाल्याने, त्याचा रात्रभर जुहू गल्ली येथे कसुन शोध घेतला. तसेच स्थानिक रिक्षाचालकांना सीसीटीव्ही फुटेज दाखवुन ओळख पटल्यानंतर सदर पथकाने एका घरामध्ये झोपलेल्या स्थितीत असलेला संशयीत आरोपी अमितकुमार उर्फ अम्मु यास शिताफीने ताब्यात घेतले. सदर पथकाने प्राप्त सीसीटीव्ही मधील फुटेजमधिल संशयीत व रिक्षात बसलेला संशयीत इसम हा तोच असल्याबाबत खातरजाम केली. ताब्यातील इसमाकडे सदर पथकाने नमुद गुन्हयाचे अनुषंगाने कौशल्यपूर्ण तपासणी करता त्याने गांज्याच्या नशापाणी करणेसाठी पाहिजे असलेल्या पैशासाठी वरील गुन्हा केल्याची स्पष्ट कबुली दिली. सदर पथकाने आरोपी नामे अमितकुमार उर्फ अम्मु उर्फ सिकंदर हरिराम बाथम, वय २० वर्षे यास नमुद गुन्हयात दिनांक १२/०४/२०१८ रोजी १६.३० वा. रितसर अटक केली. तसेच यातील जखमी इसम याची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याने त्यास ट्रामा हॉस्पीटल येथून पुढील उपचाराकरीता कुपर रुग्णालय येथे हलविण्यात आले असता, दिनांक १४/०४/२०१८ रोजी ०२.४५ वा. सदर जखमी इसम मयत झाला. सदर पथकाने नमुद गुन्हयामध्ये जखमी इसम मयत झाल्याने व आरोपीने सदरचा गुन्हा बळीताजवळीत रोख रकमेकरीता सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिल्याने नमुद गुन्हयात भादंवि कलम ३०२,३९७ अन्वये वाढ करून सदरबाबत मा. न्यायालयास कळविले.

सदर पथकाने अटक आरोपीताकडे नमुद गुन्हयातील मालमत्तेबाबत व हत्याराबाबत कसुन सखोल चौकशी करता, त्याने केलेल्या निवेदनान्वये गुन्हयातील चोरी केलेली मालमत्ता दोन सोन्याच्या अंगठया व रू. ११६०/— ही रक्कम असलेले जखमीचे पॉकिट हस्तगत केले तसेच गुन्हयाचे वेळी परिधान केलेले कपडे धोब्याकडून तसेच गुन्हयाच्या वेळी वापरलेले चप्पल व बनियान आरोपीताचे राहते घरातुन पथकाने हस्तगत केले. सदर पथकाने गुन्हयातील वापरलेले हत्यार आरोपीने गुन्हयाचे घटनास्थळापासुन २० मिटर अंतरावर असलेल्या एका पिंपळाच्या झाडाच्या बुंध्यात लपविला असल्याचे सांगीतल्याने, नमुद ठिकाणी जावून गुन्हयात वापरलेला धारदार चाकू सविस्तर पंचनाम्यान्वये हस्तगत करण्यात आला. अशा प्रकारे सदर पथकाने सर्व पुरावे पंचनाम्याअंतर्गत हस्तगत केले आहेत.

जोगेश्वरी पोलीस ठाणेचे पथकाने कोणताही पुरावा नसताना सिसिटिव्ही फुटेजच्या मदतीने व तांत्रिक तपासाचे आधारे गांजा या अंमली पदार्थाची नशापाणी करणेसाठी पैशाची आवश्यकता लागल्याने, सदर पैशाकरीता रिक्षा चालकास धारदार चाकूने जबर जखमी करून जिवे ठार मारणाऱ्या आरोपीस अवघ्या **३६ तासात अटक करून** सदर खुनाचा गंभीर गुन्हा उघडकीस आणुन मयत इसमाचीही ओळख पटविण्यात यशस्वी झाले.

सदरच्या गंभीर व संवेदनशील गुन्हयाची कौशल्याने उकल केल्याने **मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना एप्रील—२०१८ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोधाचे पारितोषिकाने सन्मानित केले आहे.

**जोगेश्वरी पोलीस ठाणे,मुंबई तपास पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार**

| अ.क्र. | पोलीस अधिकारी/अंमलदार नांव | अ.क्र. | पोलीस अधिकारी/अंमलदार नांव |
|---|---|---|---|
| ०१ | पो.नि. कौस्तुभ सहदेव मिठबांवकर | ०४ | पो.ह.क्र. २६६६०/दिलीप रामचंद्र सुर्वे |
| ०२ | पोउनि. गणेश नागनाथ जैन | ०५ | पो.ना.क्र. ८९४/सुनिल भगवान पवार |
| ०३ | पोउनि. विनोंद सुभाष पाटील | ०६ | पो.शि.क्र. ०६.२६१/दिनेश श्रीधर भाबल |

—— ००० ——